# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

## पुणे विभागीय मंडळ,पुणे ४११०००५

**-महत्वाचे-**

# -परिपत्रक-

**परिपत्रक क्रमांक/पुविमं/डीपी/माध्य.व उच्च माध्य/परीक्षा जुलै-ऑगस्ट २०१६ बाबत........**

**विषय :** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेच्या पुरवणी परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोंबर ऐवजी जुलै-ऑगस्ट मध्ये आयोजित करण्याबाबत...

**संदर्भ:** १.शासनाचे क्रमांक परीक्षा-२०१५/प्र.क्र.१२१/एसडी-२ दि.०२/०२/२०१६चे पत्र

२. राज्य मंडळाचे क्रमांक रा.मं./परीक्षा-/१००६दि.१२/०२/२०१६ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना कळविण्यात येते की,विदयार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेच्या अनुत्तीर्ण वियार्थ्यांची पुरवणी **परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोंबर ऐवजी जुलै-ऑगस्ट** मध्ये घेण्याबाबत शासनाने उपरोक्त पत्रान्वये मान्यता दिली आहे.

तरी सदरची बाब फेब्रुवारी-मार्च २०१६ च्या सर्व विदयार्थी,शिक्षक,पालक,तसेच अन्य पुर्नपरिक्षार्थी विदयार्थ्यांच्या निर्देशनास आणून दयावी.याबाबतची माहिती सर्व केंद्रावर ,शाळा,कनिष्ठमहाविदयाल-यांच्या दर्शनी भागावर लावावी तसेच अन्य प्रसिध्दी माध्यमाव्दारे सर्व संबंधित घटकांपर्यंत सदरची बाब माहिती होईल असे पहावे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५